## निशाणी क्र.३० खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जास दिलेले म्हणणे वाचले. प्रतिवादी क्र.२ विरुध्द दावा एकतर्फा व प्रतिवादी क्र.३ मयत असल्याने अर्जास त्यांच्यातर्फे म्हणणे नाही. प्रतिवादी क्र.४ ला संधी देऊनही त्याने अर्जास म्हणणे दाखल केले नाही. परिणामी, अर्ज प्रतिवादी क्र.४ विरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

०३. वादीतर्फे वकील सौ. विद्या भाटे व प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. कैलास पवार यांचा युक्तीवाद ऐकला.

०४. वादीचे कथन की, प्रस्तुत दाव्याने वादीने दावा मिळकती वडिलार्जित असुन त्यांचे वाटप करुन मिळावे व वादातील खरेदीखत वादीवर बंधनकारक नसुन ते रद्दबातल करण्यात यावे अशी विनंती केली. दरम्यान कागदपत्रांची पडताळणी केली असता प्रतिवादी क्र.१ व आई चंद्राबाई यांनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमाचे हक्कसंबंध निर्माण केल्याचे, तसेच वादी व प्रतिवादी यांच्या इतर वडिलार्जित मिळकती असल्याचे लक्षात आले. सदर परिस्थितीत वादीला दाव्यात समाविष्ट नसलेल्या प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केलेल्या अ, ब, क या मिळकती समाविष्ट करण्याकरिता व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्तीकरिता प्रस्तुतचा अर्ज अर्ज करणे भाग पडले. वादीचे पुढे कथन की, प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही. याउलट वादाचे अंतिम निराकरण होण्यास मदत होईल. सबब, अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली.

०५. याउलट प्रतिवादी क्र.१ चा युक्तीवाद की, वादीला तथाकथित खरेदीखताची मागणी एकत्रीत करता येत नाही. प्रत्येक खरेदीखताचे कारण हे वेगवेगळे आहे. परिणामी, एकाच दाव्यात वेगवेगळया खरेदीखताबाबत दाद मागितल्यास दाव्याचे स्वरुप होणार आहे. याउपर वादी हे विलंबाने दाव्यात दुरुस्ती मागत आहेत. सबब, अर्ज कायदेशीर नसल्याने फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०६. वादी व प्रतिवादी क्र.१ तर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाचे अर्जातील कथनांच्या अनुषंगाने विवेचन करण्यात आले.

०७. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता, प्रतिवादी क्र.१ ने वादीस मयत दाखवुन काही दावा मिळकतींची, तर काही दावा मिळकती वादीच्या जागी दुसऱ्या इसमाला हजर करुन विक्री केल्या. सदर कारणे वादीने त्याच्या पश्चात झालेले दावा मिळकतींची खरेदीखते त्याच्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होऊन मिळावे व दावा मिळकतीत त्याचा हिस्सा तुटक करुन कब्जा मिळावा अशी विनंती केली. प्रस्तुत अर्जामध्ये नमुद मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मिळकती असल्याचे व त्यामध्ये त्याचा हिस्सा असल्याचे कथन आहे. वादीचे सदरचे कथन व मुळ दाव्याची प्रार्थना लक्षात घेता, प्रस्तावित दुरुस्ती ही न्यायसंगत असल्याचे दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या वडिलार्जित सर्वच मिळकतींचे एकाच दाव्यात निराकरण होईल व भविष्यातील त्यांच्यात सदर मिळकतीतुन उद्भवणारे दावे टाळणे शक्य होईल.

०८. वादीस प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणतेही बदल होणार नाहीत. याउपर प्रस्तावित दुरुस्तीमुळे नवीन दावे टाळता येणे शक्य आहे. प्रस्तावित दुरुस्तीची

परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा टप्पा लक्षात घेता अद्याप उभयपक्षांतर्फे पुरावा नोंदविणे चालु झालेले नाही. परिणामी, प्रस्तावित दुरुस्तीला कायदेशीर प्रक्रियेची बाधा येत नाही. सदर चर्चिल्या बाबी लक्षात घेता वादीने मागितलेली प्रस्तावित दुरुस्तीची प्रार्थना ही प्रामाणिक असल्याचे दिसुन येते. परिणामी, अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस मागणी केल्याप्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने सदर आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत करावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/-
(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

महाड
दिनांक ३०/१०/२०२३